# Code of conduct for students, teachers, administrators and other staff and conducts periodic programmes

वरिष्ठ महाविद्यालय

प.रा.हायस्कुल सोसायटी धरणगांव संचलित
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगांव जि. जळगांव

## विद्यार्थ्यांसाठी शिस्तीचे (वर्तणुकीसंबंधी नियम)

१. गणवेश अनिवार्य. महाविद्यालयीन परिसरात ओळखपत्र आवश्यक.

१. प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र महाविद्यालयात येतांना गळ्यात टाकणे आवश्यक आहे. ओळखपत्राशिवाय कार्यालयात, ग्रंथालयात, जिमखाना खेळांना प्रवेश मिळणार नाही.

२. महाविद्यालय चालु असेल अशा प्रत्येक दिवशी तासांना नियमित हजर असलेच पाहिजे. गैरहजेरी दंडास पात्र राहिल. विद्यार्थ्यांची हजेरी ८०% आवश्यक राहिल. तासांना नियमित हजर असलेल्या पात्र विद्यार्थ्यांस परीक्षा देता येईल.

३. प्रत्येक विषयांचे स्वाध्याय वेळच्या वेळी लिहून पुर्ण केले पाहिजे. घटक चाचणी व स्वाध्याय आवश्यक.

४. प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या स्थावर मिळकतीची काळजी घ्यावी.

५. वेळा पत्रकानुसार तासांना हजर रहावे. वेळापत्रक तयार करण्याचा व त्यात बदल करण्याचा संपुर्ण अधिकार मा.प्राचार्यांना असेल.

६. विद्यार्थ्यांचे वर्तन महाविद्यालयात मा.प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेशी व इतरांशी सभ्येतला धरून असावे. आज्ञाधारकतेचे असावे, इतरांना त्रासदायक नसावे.

७. आपला रोल नंबर ज्या तुकडीत असेल त्याच तुकडीत तासाला बसावे. अन्य तुकडीत वा अन्य वर्गात बसणारा विद्यार्थी शिक्षेस पात्र राहिल.

८. वर्ग सुरू असतांना विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या इमारतीत, व्हरांड्यात भटकू नये, वर्गाची शांतता राखली जाईल अशा तऱ्हेने वागावे.

९. मा.प्राचार्यांच्या पुर्वपरवानगीशिवाय महाविद्यालयात कोणतीही संघटना किंवा मंडळ स्थापन करू नये.

१०. सुचना फलकावर लावलेल्या सुचना प्रत्येक विद्यार्थ्याने वाचाव्यात.

११. विद्यार्थ्याने एन.सी.सी./एन.एस.एस. अथवा पी.टी. यांचे तासांना तसेच विविध कार्यक्रम व व्याख्याने यांना हजर रहावे.

१२. विद्यार्थ्यांचा पोशाख निटनेटका व शिस्तमान्य असावा.

१३. ज्या बाबींचा समावेश वरील नियमात करण्यात आलेला नाही. त्या बाबतीत निर्णय घेण्याचा अधिकार मा. प्राचार्यांना राहिल.

१४. विद्यार्थ्यांनी दररोज सकाळी होणाऱ्या प्रार्थनेस नियमित हजर राहणे आवश्यक आहे.

१५. वरील नियमांचे उल्लंघन केल्यास अशा विद्यार्थ्यांस महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.



**Code of Conducts for Students**

## सभासद प्रक्रिया आणि नियम

१) महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी ग्रंथालय सभासद फार्म भरून दोन फोटो देणे आवश्यक आहे.

२) कोणत्याही विद्यार्थ्याला ओळखपत्राशिवाय ग्रंथालय प्रवेश, ग्रंथालयाचा उपयोग घेता येणार नाही.

३) घरी वाचावयास देण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत त्याच विद्यार्थ्याला पुस्तके मिळतील. पुस्तके ग्रंथालयाच्या वेळापत्रकाप्रमाणे मिळतील हे वेळापत्रक ग्रंथालय नोटीस बोर्डवर लावण्यात येते.

४) एका वेळी फक्त एकच पुस्तक मिळेल. पुस्तक दिलेल्या तारखेला विद्यार्थ्याने परत केलेच पाहिजे. पुस्तक जमा करण्यात विलंब झाल्यास प्रति दिवस १/- रूपया दंड द्यावा लागेल. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना व दुसऱ्या गरजू विद्यार्थ्यास पुस्तके घेता यावी म्हणून नाईलाजाने विलंब शुल्क ठेवून ते विद्यार्थ्यांकडून लवकर जमा करून घ्यावे लागते. विद्यार्थ्यांनी अत्यंत आवश्यक अशी क्रमीक पुस्तके स्वतः विकत घ्यावीत. इतर संदर्भ पुस्तके ग्रंथालयात बसून वाचावीत.

५) ग्रंथालयाचे वाचन साहित्य १५ मार्च पर्यंत जमा करावे. वार्षिक परीक्षेच्या काळात पुस्तके पाहिजे असल्यास पुस्तकांच्या किंमतीचे दीडपट रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल. पुस्तके नियमानुसार ग्रंथालयात जमा न झाल्यास विद्यार्थ्यांचे मार्कशीट व महाविद्यालय सोडण्याचा दाखला मिळणार नाही.

६) पुस्तक हरविल्यास पुस्तकाची दीडपट रक्कम किंवा ते नवीन पुस्तक ग्रंथालय नियमानुसार १५ दिवसाच्या आत भरले पाहिजे या परस्थितीत सुध्दा विलंब शुल्क प्रति दिवशी रू. १/- द्यावा लागेल.

७) पुस्तके चांगल्या अवस्थेत आहेत याची खात्री पुस्तके ताब्यात घेण्यापूर्वी करून घ्यावी. पुस्तके फाटके किंवा अपुरे असल्याबद्दलची तक्रार मागून ऐकण्यात येणार नाही. पुस्तक फाडून आणल्यास त्याची पुर्ण रक्कम वसूल केली जाईल व सदर पुस्तक ग्रंथालयात जमा करावे लागेल.

८) ग्रंथालयात वेळोवेळी सूचना फलकावर लावण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे.

९) ओळखपत्र हरविल्यास महाविद्यालयाने नेमून दिलेली फी भरून ती पावती व पासपोर्ट साईज १ फोटो ग्रंथालयात दिल्यावर दुसरे ओळखपत्र दिले जाईल.

१०) ज्या बाबी चा समावेश वरील नियमात झालेला नाही त्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार मा.प्राचार्य सो. यांना राहिल.

## वाचनकक्ष सूचना आणि नियम

१) वाचनकक्ष विभागात प्रवेश करतांना विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

२) आपले ओळखपत्र इतरांना देऊ नये.

३) वाचनकक्ष विभागात ठेवलेले ग्रंथ व इतर वाचन साहित्य कोणत्याही कारणास्तव वाचनकक्षाबाहेर नेता येणार नाही. तसे आढळल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल. अशा विद्यार्थ्यास त्यानंतर वाचनकक्षात प्रवेश मिळणार नाही.

४) कक्षात नेहमी शांतता ठेवावी. मोठ्याने बोलू नये.

५) वाचनकक्षात ठेवलेले ग्रंथ अतियश काळजीपूर्वक हाताळावे. त्यातील पाने फाडू नये किंवा शाई वा पेन्सिलने लिहू नये. पुस्तकाची काळजी घेणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे.

६) विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली संदर्भ ग्रंथ / पुस्तके स्वतः विकत घेणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही याचा विचार करून ग्रंथालयाचा वाचनकक्ष सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत उघडा ठेवण्यात येतो.

७) विद्यार्थ्याने वाचनकक्षात ठेवलेल्या नोंदवहीत आपल्या येण्याची वेळ नोंदवावी.



**Code of Conducts for Library**

# Report

Committee: **Legal awareness program and Yuvati Sabha**

Sir, due to covid 19, most of the academic year 2020-21 was locked down. In addition, despite some restrictions being lifted, students were not allowed to enter or teach at the college to prevent the spread of Corona. Therefore, the physical meeting of the Legal awareness program and Yuvati Sabha could not be held in this academic year. Therefore, the members of the committee kept in touch with each other from time to time in a virtual manner throughout the year and the work of the committee continued.

Thank You

**Dr.C.S.Sukhadane**
Chairman
Legal awareness program and Yuvati Sabha
ACS College Dharangaon, Jalgaon

# Report

Committee: **Women's Grievance Redressal Committee**

Sir, due to covid 19, most of the academic year 2020-21 was locked down. In addition, despite some restrictions being lifted, students were not allowed to enter or teach at the college to prevent the spread of Corona. Therefore, the physical meeting of the Women's Grievance Redressal Committee could not be held in this academic year. Therefore, the members of the committee kept in touch with each other from time to time in a virtual manner throughout the year and the work of the committee continued.

Thank You

**Dr.Kanchan D.Mahajan**
Chairman
Women's Grievance Redressal Committee
ACS College Dharangaon, Jalgaon